Listening Comprehension

# <u>पतंग</u>

यश, नील आणि चंदू पतंग उडवित होते. यशचा पतंग लाल, नीलचा हिरवा आणि चंदूचा पिवळा होता. यशचा पतंग उंचावर गेला. यश आनंदाने नाचत होता. नीलचा पतंग झाडात अडकला आणि चंदूचा पतंग फाटला. नील पतंग काढायला झाडावर चढला. चंदू रडायला लागला. नीलचे बाबा आले. बाबांनी नीलला पतंग काढून दिला आणि चंदूला नवीन पतंग दिला. सगळेजण मजेत पतंग उडवायला लागले.

प्रश्न:

१) पतंगांचे रंग कोणते होते?

२) यशला आनंद का झाला?

३) चंदूचा पतंग फाटल्यावर चंदूने काय केले?

४) नीलच्या बाबांनी काय केले?

५) शेवटी सगळयांनी काय केले?

Listening Comprehension

## **मांजर आणि चिमणी**

चिमणी झाडावर बसली होती आणि मांजर झाडाखाली बसली होती. मांजर बोलली, 'चिमणी ताई, खाली ये. ' चिमणी म्हणाली, ' मांजर ताई, वर ये. ' मांजर झाडावर चढून गेली, चिमणी उडून खाली आली. मांजर चिडली आणि तिने उडी मारली. खाली खूप चिखल होता. मांजर चिखलात पडली. चिमणी उडून गेली. मांजरीची फजिती झाली.

प्रश्न:

१) गोष्टीत कोण कोण आहे ?

२) मांजर कुठे बसली होती ?

३) चिमणी कुठे बसली होती ?

४) चिमणी काय बोलली?

५) मांजर का चिडली ?

Reading Comprehension

## अवनी आणि फुगा

आज अवनीचा वाढदिवस होता. बाबांनी अवनीला एक फुगा आणला. हिरवा हिरवा फुगा. मग वारा आला. फुगा हातातून सुटला. एका झाडावर गेला. झाडावर एक माकड होते. माकडाने फुगा हातात धरला. फुगा फटकन फुटला. माकड घाबरून पळाले आणि अवनी हसायला लागली.

प्रश्न:

१) अवनीचा फुगा कोणत्या रंगाचा होता?
२) फुगा हातातून का सुटला?
३) फुगा कुठे गेला?
४) झाडावर कोण होते?
५) माकड का घाबरले?

Reading Comprehension

## <u>फोटो</u>

माझी आई खूप छान फोटो काढते. माझे खूप फोटो आहेत. मी नवीन कपडे घातले की आई फोटो काढते. माझे सगळे फोटो हसरे आहेत. माझी बहीण फोटो काढताना वाकडी तोंडे करते. ते पाहून मी खूप हसतो. जुने फोटो बघायला मला खूप आवडते.

प्रश्न:

१) आई काय करते?
२) आई कधी फोटो काढते?
३) मी फोटोत काय करतो?
४) मी का हसतो?
५) मला काय करायला आवडते?